जलसंपदा विभाग

महाराष्ट्र शासन
**अधीक्षक अभियंता**
**उर्ध्व वर्धा सिंचन मंडळ, अमरावती**

पत्ता : उर्ध्व वर्धा सिंचन वसाहतशिवाजीनगर , , पीन कोड ४४४६०३ दुरध्वनी कार्यालय : (०७२१) २६६२२८२
ई मेल .:seuwpc.avatiwrd@maharashtra.gov.in & uwpcamt2015@gmail.com


जा.क्र.२३०३/उवसिंमं/आ.४/२०२२ दिनांक :- 08 JUN 2022

प्रति,

अधिक्षक अभियंता
जलसंपदा ई प्रशासन मंडळ
पुणे

विषय:- जलसंपदा विभागातील सेवानिवृत्त अधिकारी यांच्या कंत्राटी पध्दतीवर नेमणूक करण्याबाबत - जाहिरात जलसंपदा विभागाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्याबाबत.

संदर्भ :- मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, अमरावती यांचे पत्र क्र. १९७८/आ-१/ से.नि.कंत्राटी/ २०२१ दि. ०७/०६/२०२२.

सोबत जलसंपदा विभागातील सेवानिवृत्त अधिकारी यांच्या कंत्राटी पध्दतीवर नेमणूक करण्याबाबत-जाहिरात आपणाकडे पाठविण्यात येत आहे. तरी सदर जाहिरात https://wrd.maharashtra.gov.in या वेबसाईटवर दि. १०/०६/२०२२ व त्यापुर्वी प्रसिध्द करावी ही विनंती.

सहपत्र: जाहिरात व टिप्पणी

सदस्य सचिव तथा
सहा.अधीक्षक अभियंता
उर्ध्व वर्धा सिंचन मंडळ,
अमरावती

प्रतिलिपी,
मा. मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, अमरावती यांना माहिती करिता सविनय सादर.
सहपत्र :- जाहिरात

# कार्यालयीन टिप्पणी

दिनांक :-

जा.क्र. /उवसिंमं/आ.४/२०२२

विषय :- जलसंपदा विभागाच्या संकेतस्थळावरती माहिती अपलोड करण्याबाबत.

| अ.क्र. | विषय | शेरा |
|---|---|---|
| १ | अपलोड करण्यात येणाऱ्या फाईल / धारिकांचा विषय | जलसंपदा विभागातील सेवानिवृत्त अभियंता यांच्या कंत्राटी पध्दतीवर नेमणूक करण्याबाबत |
| २ | अपलोड करण्याबाबत मागणी करण्यात आलेले कार्यालयाचे नांव | अधिक्षक अभियंता, उर्ध्व वर्धा सिंचन मंडळ, अमरावती |
| ३ | अपलोड करण्याविषयी मागणी करण्यात आलेल्या पत्राचा दिनांक | |
| ४ | माहिती किती कालावधीसाठी अपलोड करावयाची आहे ? | दि. १०/०६/२०२२ पासून दि. १५/०६/२०२२ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत |
| ५ | कारण | जलसंपदा विभागातील सेवानिवृत्त अभियंता यांच्या कंत्राटी पध्दतीवर नेमणूक करण्यास्तव |
| ६ | संकेतस्थळावरती माहिती कोठे अपलोड करावा याचा तपशील (उदा. पत्रपेटी, घटना व प्रकटने.....) | वेबसाईटचे मुखपृष्ठावरील Marquee वर प्रसिध्द करण्यात यावे. |
| ७ | अपलोड करण्यात येणाऱ्या फाईल / धारिकांची संख्या | ०१ (एक) |

सदस्य सचिव तथा
सहा.अधिक्षक अभियंता
उर्ध्व वर्धा सिंचन मंडळ
अमरावती

| | |
|---|---|
| सत्यमेव जयते | **विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ,नागपुर**<br>**अधीक्षक अभियंता,** उर्ध्व वर्धा सिंचन **मंडळ,** अमरावती.<br>सिंचन सेवा भवन, शिवाजी नगर,कॅम्प अमरावती<br>Phone : ०७२१-२६६२२८२/२६६२३३५ Email:<br>uwpcamt२०१५@gmail.com |


# सेवानिवृत्त अभियंता यांच्या कंत्राटी पध्दतीवर नेमणूक करण्याबाबत

महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/ १३ मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक मंत्रालय मुंबई ४०००३२ दि.१७/१२/२०१६ अनुसार खालील संवर्गातील फक्त जलसंपदा विभागातील सेवानिवृत्त अभियंता यांना कंत्राटी पध्दतीवर या मंडळांतर्गत कार्यरत असलेल्या अमरावती जिल्हयातील अधिनस्थ कार्यालयांमध्ये प्रकल्प अभियंता म्हणुन नेमणूका करावयाची आहेत. सेवानिवृत्त अभियंता यांना सेवा उर्ध्व वर्धा सिंचन मंडळ,अमरावती यांचे अधिनस्थ “प्रकल्प अभियंता” म्हणुन राहील. **ईच्छुक अर्जदारांनी विहीत नमुन्यातील अर्ज अधीक्षक अभियंता, उर्ध्व वर्धा सिंचन मंडळ, अमरावती यांच्याकडे दिनांक १५/०६/२०२२ रोजी सायं. ५.०० वाजेपर्यत प्रत्यक्ष सादर करावेत किंवा पोस्टाव्दारे विहित कालमर्यादेत सादर करावेत.** अर्जाचे पाकीटावर “सेवानिवृत्त अभियंता यांच्या कंत्राटी पध्दतीने नेमणूक करण्याबाबत” असे स्पष्ट लिहुन ज्या पदासाठी अर्ज सादर केला आहे त्या पदाचे नांव लिहण्यांत यावे. नियोजीत दिनांकानंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार करण्यांत येणार नाही. सदर नेमणूका समितीच्या मुलाखतीव्दारे करण्यांत येतील. सदर नेमणूकांचे आदेश समितीच्या मान्यतेनंतरच निर्गमीत करण्यांत येतील.

### कंत्राटी पध्दतीवर भरावयाचा पदांचा तपशिल खालीलप्रमाणे

| अ.क्र. | संवर्ग | पद संख्या | विवक्षित कामाचा तपशिल | पात्रता |
|---|---|---|---|---|
| (१) | [illegible] शाखा अभियंता/ कनिष्ठ अभियंता | ४ | प्रकल्प अभियंता | जलसंपदा विभागातुन सेवानिवृत्त अभियंता |

सदर नेमणूकीकरीता लागु असलेल्या अटी व शर्ती तसेच अर्जाचा नमुना हा महाराष्ट्र शासनाच्या जलसंपदा विभागाच्या ई-जलसेवा या वेबसाईट <u>https://wrd.maharashtra.gov.in</u> चे मुखपृष्ठावर उपलब्ध आहे. तसेच हा अर्ज व अटी / शर्ती अधीक्षक अभियंता, उर्ध्व वर्धा सिंचन मंडळ, अमरावती यांचेकडे उपलब्ध आहे.

| अ.क्र. | मंडळ कार्यालयाचे नांव व पत्ता | दुरध्वनी क्रमांक |
|---|---|---|
| (१) | अधीक्षक अभियंता, उर्ध्व वर्धा सिंचन मंडळ अमरावती, उर्ध्व वर्धा वसाहत, शिवाजी नगर, कॅम्प, अमरावती पीन कोड ४४४६०३ | ०७२१/२२६६२२८२ |

## सदर नेमणूका ह्या खालील सर्वसाधारण शर्ती व अटीच्या अधिन राहतील.

१) करारपध्दतीवर नेमणूकी करीता अर्ज करते वेळी सेवानिवृत्त अधिकारी यांचे वय दिनांक ०१/०६/२०२२ रोजी ७० वर्षेपेक्षा अधिक नसावे.

२) अर्ज करणा-या सेवानिवृत्त अधिकारी यांनी ज्या पदासाठी अर्ज केले आहे, त्या पदाचा किमान तीन वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे.

३) अर्ज करणा-या सेवानिवृत्त अधिकारी विरुध्द कोणत्याही प्रकारची विभागीय चौकशी व न्यायालयीन प्रकरण नसावी याबाबत अर्जदारांनी ज्या कार्यालयातुन सेवानिवृत्त झाले आहे, त्या संबंधीत कार्यालयाकडुन तसे प्रमाणपत्र घेण्यांत यावे.

४) अर्ज करणा-या सेवानिवृत्त अधिकारी हे शारीरीक, मानसिक वा आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असणे आवश्यक आहे.

५) करारपध्दतीने नियुक्ती देण्यांत आल्यामुळे संबंधीतास शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाबाबत किंवा सामावून घेण्याबाबत वा नियमित सेवेचा इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार नसेल याबाबत अर्जदाराने रु.१००/- च्या स्टॅम्पवर प्रतिज्ञालेख देण्यांत यावा.

६) नियुक्त अर्जदाराला त्यांनी विहीत कार्यपालन केल्यामुळे शासन सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३ दि.१७/१२/२०१६ मधील अटी व शर्तीप्रमाणे त्यांना सेवानिवृत्तीपूर्वी मिळत असलेल्या एकुण वेतनातुन (मुळ वेतन व महागाई भत्ता धरुन त्यांना आता मिळत असलेले एकुण निवृत्ती वेतन) (महागाई भत्ता आणि अंशराशीकृत निवृत्तीसह) वजा केल्यानंतर होणारी रक्कम मासिक परिश्रमिक म्हणुन त्यांना अनुज्ञेय राहील.

७) करार पध्दतीने नियुक्त झालेल्या अर्जदारास आवश्यक प्रसंगी दौरा करावा लागल्यास त्यांना त्यांच्या निवृत्तीच्या वेळच्या वेतनमानास अनुसरुन प्रवास भत्ता व दैनिंक भत्ता अनुज्ञेय राहील.

८) नियुक्ती प्राधिकारी यांना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी करार पध्दतीवरील सेवा समाप्त करण्याचे पुर्ण अधिकार राहतील.

९) करार पध्दतीने नियुक्त झालेल्या अर्जदारास नेमून दिलेले काम समाधानकारक नसल्यास कोणतेही सबळ कारण न देता त्यांची सेवा समाप्त करण्यांत येईल.

१०) कार्यालयीन स्तरावर करार पध्दतीने नियुक्त झालेल्या अर्जदारास सेवाकाळामध्ये काही नैसर्गीक
अपघात व काही आजार उद्भवल्यास कार्यालय / शासन बांधील राहणार नाही.

११) करार पध्दतीने नियुक्त झालेल्या अर्जदारास नेमूणक दिलेली कामे पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधीत व्यक्तीची राहील व तसे बंधपत्र / हमीपत्र त्यांच्याकडुन घेण्यांत येईल.

१२) अर्ज करतेवेळी सेवानिवृत्त अधिकारी यांनी त्यांचे कुटूंब निवृत्तीवेतन मंजुरीचे महालेखापाल कार्यालयाचे आवश्यक दस्तऐवज सादर करावेत.

१३) करार पध्दतीने नियुक्त झालेल्या अर्जदाराने नियुक्तीच्या ठिकाणी नियुक्ती आदेश निर्गमित झालेल्या दिनांकापासुन १५ दिवसाचे आत रुजु होणे बंधनकारक राहील अन्यथा सदर नियुक्ती आपोआप संपुष्ठात येईल.

१४) सदर नेमणूक सात ते आठ महिन्यापेक्षा वाढविण्याची आवश्यकता भासल्यास नियुक्ती अधिकारी तसा निर्णय घेऊ शकतात.